गुरुवार ६.५.२०२१ महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत

# कर्मवीर भाऊराव पाटील समूह विद्यापीठाला मान्यता

## मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय : कला, वाणिज्य आणि शास्त्र महाविद्यालयांचे एकत्रित काम

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : शिक्षणाची गंगा ग्रामीण भागात गरिबाच्या झोपडीपर्यंत नेणारा आधुनिक भगीरथ म्हणून ज्या कर्मयोग्याची ओळख सांगितली जाते त्या कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या नावाने समूह विद्यापीठ स्थापन करण्यास बुधवारी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. पहिल्या टप्प्यात साताऱ्यातील छत्रपती शिवाजी कॉलेज, यशवंतराव चव्हाण शास्त्र महाविद्यालय आणि धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय या तीन स्वायत्त महाविद्यालयांचे मिळून हे विद्यापीठ असेल. या तिन्ही महाविद्यालयांना "नॅक"चा सर्वोत्कृष्टतेचा 'ए प्लस' हा दर्जा आहे.

रयत शिक्षण संस्थेमार्फत पारंपरिक शिक्षण पद्धतीबरोबर कौशल्य आधारित शिक्षण दिले जाते. राज्यात या संस्थेची अनेक महाविद्यालये आहेत. संस्थेचे राज्यस्तरीय समूह विद्यापीठ (क्लस्टर युनिव्हर्सिटी) व्हावे, अशी अनेक दिवसांपासूनची मागणी होती. त्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करावा, असे निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिले होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे खासदार शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत रयत शिक्षण संस्थेच्या विविध मागण्यांसंदर्भात बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच गतवर्षी कर्मवीर भाऊराव पाटील पुण्यतिथीनिमित्तही समूह विद्यापीठाबाबत मागणी करण्यात आली होती.



> कर्मवीर अण्णांच्या पुण्यतिथीच्या पार्श्वभूमीवर अण्णांच्या नावाच्या या समूह विद्यापीठाला शासनाची मान्यता मिळाल्याने याचे वेगळे समाधान आहे. साताऱ्याच्या शैक्षणिक विश्वातील हे सोनेरी पान म्हणावे लागेल.
>
> **डॉ. अनिल पाटील**, चेअरमन, रयत शिक्षण संस्था

समूह विद्यापीठासाठी लागणारा निधी देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत ३३ कोटी रुपये केंद्र शासन आणि २२ कोटी रुपये राज्य शासन असा एकूण ५५ कोटी रुपयांचा प्रस्ताव असून, तो मंत्रिमंडळासमोर मांडण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी घेण्यात आला होता. ज्या महाविद्यालयांकडे पुरेशा शैक्षणिक, भौतिक व तांत्रिक पायाभूत सोयी-सुविधा आहेत अशा ३ ते ५ विद्यमान महाविद्यालयांची संसाधने एकत्रित करून ही विद्यापीठे निर्माण करण्याकरिता तसेच विद्यापीठाचे विविध दर्जात्मक मापदंड मोठ्या प्रमाणात दर्शवून गुणवत्तेचा दर्जा राखण्यात समर्थ असलेल्या महाविद्यालयांचा समावेश करण्यात येईल, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

शासनाच्या मान्यतेच्या वृत्ताबाबत संस्थेचे अध्यक्ष व कर्मवीरांचे पणतू डॉ. अनिल पाटील "लोकमत"शी बोलताना म्हणाले, "पारंपरिक विद्यापीठांपेक्षा या विद्यापीठाचा अभ्यासक्रम वेगळा असेल. येथे शैक्षणिक कौशल्याबरोबरच इतर कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाला प्राधान्य असेल. विद्यार्थ्याला कोणतं कौशल्य आत्मसात करायचं आहे, त्यादृष्टीने अभ्यासक्रम ठरवण्याचं स्वातंत्र्य त्याला या ठिकाणी असणार आहे."

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.